**विज्ञानाच्या युगात अध्यात्मिक विचारसरणी बाळगणे ही सुध्दा काळाची गरज आहे - श्रीमती विनीता साहू**
**श्री आर.एम.बडकस, कार्यालय अधिक्षक यांचा सेवानिवृत्ती सत्कार कार्यक्रम**

विज्ञानाच्या युगात प्रशासकीय सेवेत काम करतांना प्रत्येकाने नविन तंत्रज्ञानाचा व आधुनिक कार्यपध्दतीचा स्विकार केल्यास प्रत्येक प्रशासकीय विभागात एक सक्षम व यशस्वी प्रशासकीय अधिकारी तयार होईल तसेच विज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवी जीवन स्पर्धेचे व धावपळीचे झाले असून विज्ञानाच्या युगात आत्मिकशांती,संयम व मानसीक समाधानाकरीता अध्यात्मिक विचारसरणी बाळगणे ही सुध्दा काळाची गरज आहे असे प्रतिपादन श्रीमती विनीता साहू, पोलीस अधीक्षक, भंडारा यांनी केले. दिनांक ३१/१/२०१७ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयातील श्री आर.एम.बडकस, कार्यालय अधिक्षक यांचे सेवानिवृत्ती सत्कार कार्यक्रमाचे प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून त्या बोलत होत्या. त्यांचे हस्ते श्री आर.एम.बडकस, कार्यालय अधिक्षक यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले व पोलीस अधिक्षक कार्यालयाचे वतीने भेटवस्तु प्रदान करण्यात आली.

सत्कार कार्यक्रमाकरीता प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती रश्मि नांदेडकर, अपर पोलीस अधीक्षक, भंडारा व श्री बि.आर.गाडे, पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय) भंडारा हे उपस्थीत होते. कार्यक्रमाचे संचालक श्री भैया धोटे यांनी तर आभार प्रदर्शन श्री प्रशांत कारंजकर यांनी केले. सदर कार्यक्रमाकरीता कार्यालयीन शाखेतील सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी तसेच कार्यालयातील लिपीक वर्गीय अधिकारी/कर्मचारी उपस्थीत होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता पोनि श्री जी.डी.राउत, रापोनि श्री ए.टी.लोळे, सपोनि श्री व्ही.बि.वाकडे, सपोनि श्री बि.आर.पुसाटे, रापोउपनि श्री एम.के.प्रधान तसेच कार्यालयातील श्री एस.एस.वडनेरकर, श्री.यु.सी.नायक, श्री व्ही.एम.कडू, श्री जे.सी.मिश्रा, श्रीमती ए.ए.शिवणकर, श्रीमती एन.एन.पशिने, श्रीमती एस.एम.टेंभुरकर, श्री एम.एस.लिमजे, श्री पी.एस.गोखले, श्री एस.एम.जमईवार, श्री आतीब पटेल व ईतर सर्वांनी मोलाचे सहकार्य केले.

( बि.आर.गाडे )
पोलीस उपअधिक्षक (मुख्या.)
पोलीस अधीक्षक, भंडारा करीता